आसाममधील मदरशावर स्थानिक रहिवाशांकडून बुलडोझर

पीटीआय, गुवाहाटी

राष्ट्रवादी आणि जिहादी कारवायांसाठी वापर केला जात असल्याचा आरोप करून आसाममधील गोलपारा जिल्ह्यातील एका मदरशावर स्थानिक रहिवाशांनीच बुलडोझर चालवला. हा मदरसा आणि त्याच्या शेजारील एका निवासस्थानावरही स्थानिकांनी कारवाई केली, अशी माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.

गोलपारा जिल्ह्यातील पाखिऊरा चार या ठिकाणी मातिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा मदरसा होता. हा मदरसा आणि त्याच्या जवळील निवासस्थानाचा वापर दोन बांगलादेशी नागरिक जिहादी कारवायांसाठी करत होते. मदरशाचा मौलवी जलालुद्दीन शेख याच्या अटकेनंतर या जागेचा देशविरोधी कारवायांसाठी वापर केल्याचे समोर आले. सध्या हे दोन बांगलादेशी नागरिक फरारी आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

या मदरशाचा वापर देशविरोधी कारवाईसाठी केला जात असल्याचे समोर आल्यानंतर स्थानिक रहिवाशांनी बुलडोझरच्या साहाय्याने हा मदरसा जमीनदोस्त केला.

आसाममध्ये आतापर्यंत पाडण्यात आलेला हा चौथा मदरसा आहे. स्थानिकांनी तीव्र संतापाच्या भरात पुढाकार घेत हा मदरसा आणि त्याच्या बाजूचे निवासस्थान पाडले, असे पोलिसांनी सांगितले.

फरारी झालेल्या दोन बांगलादेशींची नावे अमिनुल इस्लाम ऊर्फ मेहदी हसन आणि जहांगीर आलोम अशी असून ते अल कायदाच्या अन्सारूल बांगला गटाचे दहशतवादी आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

करोनाची लस आता नाकाद्वारे

भारत बायोटेकच्या लशीला 'डीजीसीआय'ची मान्यता

हैदराबाद : भारत बायोटेकच्या नाकातून देता येईल अशा कोविड-१९ लशीला केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्था (सीडीएससीओ) आणि भारतीय औषध नियंत्रक (डीसीजीआय) यांनी मंगळवारी मान्यता दिली. केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया यांनी ट्विटरवरून याबाबत माहिती दिली.

नाकातून देता येणारी ही देशातील पहिलीच करोना लस आहे. येथील भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड या औषध निर्मिती कंपनीने या लशीच्या मानवी चाचण्या नुकत्याच पूर्ण केल्या आहेत. लशीबरोबरच नाकातून लस देता येणारी यंत्रणादेखील कंपनीने विकसित केली असून तिची किंमतही कमी असल्याचे कंपनीने म्हटले आहे. त्यामुळे गरीब देशांनाही ही लस परवडेल, असा दावा करण्यात आला आहे.

या लशीच्या टप्पा-३मधील चाचण्या सुरू करण्यासही डीसीजीआयने भारत बायोटेकला परवानगी दिली आहे. कोव्हॅक्सिन आणि 'बीबीव्ही-१५४' या दोन लशींची परिणामकारकता आणि सुरक्षेची तुलना या चाचणीत केली जाईल. एकूण ९ ठिकाणी चाचणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

नवे काय? : 'बीबीव्ही-१५४' या लशीच्या ४,००० स्वयंसेवकांवर चाचण्या करण्यात आल्या असून आतापर्यंत लशीचा कोणताही दुष्परिणाम आढळून आला नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

वैशिष्ट्य... नाकातून दिली जात असल्यामुळे ही लस श्वसनयंत्रणेच्या वरच्या भागात प्रतिजैविके तयार करते. परिणामी विषाणूचा प्रादुर्भाव आणि प्रसार नियंत्रणात ठेवला जाऊ शकतो, असे कंपनीने स्पष्ट केले आहे.

भारताच्या करोनाविरोधातील लढ्याला मोठं यश मिळाले आहे. भारत बायोटेकच्या नाकातून देता येणाऱ्या लशीला १८ वर्षांवरील व्यक्तींच्या मर्यादित वापरासाठी सीडीएससीओने परवानगी दिली आहे. कोविडविरोधी लढाईत भारतानं विज्ञान, संशोधन आणि मानव संसाधनाचा यथायोग्य वापर केला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून आणि सर्वांच्या प्रयत्नाने आपण कोविड-१९ला हरवू.
- मनसुख मंडाविया, केंद्रीय आरोग्यमंत्री

येमेनमध्ये दहशतवादी हल्ल्यात २७ ठार

कैरो : येमेनच्या सुरक्षा चौकीवर अल कायदाच्या संशयित दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २७ जण ठार झाले आहेत. मृतांमध्ये २१ येमेनी सैनिकांचा समावेश असून सहा दहशतवादी मारले गेल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

अबियान प्रांतातील अहवार इथल्या सुरक्षा चौकीवर हा भीषण हल्ला झाला. येमेनच्या दक्षिणेकडील भाग फुटीरतावाद्यांच्या ताब्यात असून त्यांना संयुक्त अरब अमिरातींचा पाठिंबा आहे. सत्ताधारी गट आणि फुटीरतावाद्यांमध्ये सातत्याने खटके उडत आहेत.

ब्रिटनच्या नव्या पंतप्रधानांकडून करकपातीचे सूतोवाच

पहिल्याच भाषणात अर्थव्यवस्था सावरण्याचे आश्वासन

लंडन : लिझ ट्रस यांनी मंगळवारी ब्रिटनच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. महाराणी एलिझाबेथ द्वितीय यांनी ट्रस यांची या पदावर अधिकृत नियुक्ती जाहीर केल्यानंतर त्यांनी '१०, डाऊनिंग स्ट्रीट' या अधिकृत निवासस्थानी पंतप्रधान म्हणून पहिले भाषण केले. यावेळी त्यांनी करकपात करतानाच देशाची अर्थव्यवस्था सावरण्याचे आश्वासन नागरिकांना दिले.

स्कॉटलंडमधील सुटीकालीन निवासस्थानी ट्रस यांनी महाराणी एलिझाबेथ यांची भेट घेतली. तत्पूर्वी मावळते पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी महाराणींकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. आपल्या पहिल्या भाषणात ट्रस यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावर हल्लाबोल केला. त्यांनी लादलेल्या युक्रेन युद्धामुळे ब्रिटनमध्ये विजेचे संकट निर्माण झाले आहे. मात्र, आपण त्याचा यशस्वी मुकाबला करू, अशी ग्वाही त्यांनी दिले.

आता ट्रस आपल्या मंत्रिमंडळाची घोषणा करतील. ॲटर्नी जनरल सुएला ब्रेव्हरमन या नव्या मंत्रिमंडळातील भारतीय वंशाचा एकमेव चेहरा असण्याची शक्यता आहे. जॉन्सन यांचे विश्वासू, माजी गृहमंत्री प्रीती पटेल आणि माजी अर्थमंत्री ऋषी सुनक यांनी ट्रस मंत्रिमंडळात सहभागी होण्यास अप्रत्यक्ष नकार दिला आहे.

मंत्रीमंडळात भारतीय वंशाचा एकमेव चेहरा?

ट्रस मंत्रिमंडळात समावेश होण्याची शक्यता असलेल्या सुएला ब्रेव्हरमन यांचे आई-वडील भारतीय वंशाचे आहेत. त्यांचे वडील क्रिस्टी यांचा जन्म गोव्यात झाला, तर आई उमा फर्नांडिस यांचा जन्म मॉरिशसमधील तमिळ कुटुंबातला आहे.

'अतिरेकी मूलतत्त्ववादी शक्तींचा एकजुटीने सामना'

पंतप्रधान मोदींचे हसिना यांना आवाहन, बांगलादेशबरोबर कुशियारा पाणीवाटप करार

नवी दिल्ली : भारत आणि बांगलादेशमधील परस्पर विश्वासाला बाधा आणणाऱ्या अतिरेकी मूलतत्ववादी शक्तींचा एकत्र येऊन मुकाबला करू, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. भारताच्या दौऱ्यावर असलेल्या बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसिना यांच्यासोबत त्यांनी मंगळवारी द्विपक्षीय चर्चा केली. या भेटीमध्ये दोन्ही देशांमध्ये २५ वर्षांमधला पहिला जलवाटप करारही अस्तित्वात आला आहे.

अतिरेकी, मुलतत्ववाद्यांचा सामना करण्यासाठी परस्पर सहकार्याबाबत चर्चा झाली. १९७१पासूनचे संबंध कायम ठेवण्यासाठी, परस्पर विश्वासावर आघात करणाऱ्या अशा शक्तींचा एकत्र सामना करणे आवश्यक आहे.
- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

दोन्ही देशांनी सहकार्याच्या मार्गाने अनेक प्रश्न सोडवले आहेत. तिस्ता नदी पाणीवाटपासह अन्य मुद्देही लवकरात लवकर निकाली निघतील. - शेख हसिना, पंतप्रधान, बांगलादेश

पंतप्रधान मोदी आणि शेख हसिना यांच्या भेटीनंतर एकूण ७ करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये कुशियारा नदी जलवाटपाचा करार सर्वात महत्त्वाचा ठरला आहे. बांगलादेश आणि भारतामध्ये ५४ सामायिक नद्या आहेत.

कुशियारा पाणीवाटप करारामुळे दक्षिण आसाम आणि बांगलादेशातील सिल्हेत या भागांना फायदा होणार आहे.

बांगलादेश आणि पश्चिम बंगालमध्ये तिस्ता नदीच्या पाण्यावरून असलेला मोठा वाद सोडवण्याच्या दृष्टीने कुशियारा करार महत्त्वाचा मानला जात आहे.

१९७१च्या बांगलादेश मुक्तीलढ्यात शहीद झालेल्या भारतीय सैनिकांच्या वारसांना मुजिब शिष्यवृत्ती देण्याची घोषणा शेख हसिना यांनी केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सुमारे २०० शहिदांच्या वारसांना बुधवारी या शिष्यवृत्तीचे वितरण केले जाणार आहे.

सी.बी.कोरा ग्रामोद्योग संस्थान
खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
शिपोली गाव, म्युनसिपल शाळेसमोर, बोरीवली (पश्चिम)
गव्हर्मेंट सर्टिफिकेट कोर्स
मधुबनी, फड पेंटींग कोर्स
ह्या आठवड्यात सप्टेंबर २०२२ पासून
या कोर्समध्ये दोन्ही पारंपारिक (फोक) कला कॅनव्हास व फॅब्रिक पेंटींग शिकवले जाईल आणि ह्या कलाकृती कलरच्या सहाय्याने पेंटींग करुन घेण्यात येईल.
हर्षला हेमंत सावंत 8693098181 9820854558 9820084558

IDEMI
सत्यमेव जयते
MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES
MSME TECHNOLOGY CENTER (IDEMI), MUMBAI
Government Certificate Course on
SOLAR ROOFTOP INSTALLATION
२ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम
Date: 17 & 18 Sep 2022 Time: 10.00 am to 5.00 pm
Venue & Registration: IDEMI, Swatantryaveer Tatya Tope Marg, Chunabhatti, Sion PO Mumbai - 400 022
Email:automation@idemi.org, Web.: www.idemi.org, Ph.: (022) 2405 0301/2/3/4
DEMO ON 5 KW ROOFTOP SOLAR SYSTEM
Contents: Solar basics, Solar system components, Installation techniques, Selection of materials, case study, Off-grid and On-grid solar system
अभियासक्रम शुल्क: रु. 4500+18% GST रक्कम खालील नावे IDEMI, Mumbai (अल्पोपहार व भोजन समेविष्ट)
For Whom: Engineers, Architect, Budding Entrepreneurs, Students, Other Interested candidates
Mobile - 9405040524, 9819495547, 9029858848
Documents required: Aadhar card xerox, Education documents, 2 Passport photograph

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक
मुख्य कार्यालय: निगमित सेवा विभाग
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे 411 005
फोन : 020-25614336/239
प्रस्तावासाठी विनंती (आरएफपी)
"बँक ऑफ महाराष्ट्र, मुख्य कार्यालय, लोकमंगल पुणे येथे 500 केव्हीए डिझेल जनरेटरचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि चालू करणे तसेच 5 वर्ष सर्वसमावेश देखरेखीसह" कामासाठी मोहोरबंद निविदा आमंत्रित करत आहे. संभाव्य प्रस्तावक आरएफपी निविदा प्रपत्र बँकेची बेबसाईट www.bankofmaharashtra.in वरुन डाऊनलोड करु शकतात.
निविदा सादर करण्याची तारीख : दि. 20/09/2022 (14.00 वा.).
वरील निविदेसंदर्भातील इतर परिशिष्ट / शुद्धीपत्रक / विस्तारीत तारखा / स्पष्टीकरण /प्रस्तावकांच्या शंकांसंदर्भातील निरसन, हे सर्व फक्त बँकेची वेबसाईट www.bankofmaharashtra.in वर पोस्ट करण्यात येईल आणि यासंदर्भात कोणतीही स्वतंत्र अधिसूचना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही.
सहाय्यक महाव्यवस्थापक, निगमित सेवा

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड
जाहिरात संदर्भ क्र.एमआरवीसी/इ/पीई/1/2022
मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन लिमिटेड (एमआरवीसीएल)
कंत्राटी पद्धतीने भरल्या जाणाऱ्या तेसेच गेट स्कोअर-2022 च्या आधारावर
प्रोजेक्ट अभियंता (सिविल)
या पदासाठी अर्ज आमंत्रित करीत आहे.
एमआरवीसी लि. मध्ये अर्ज प्रस्तुत करण्याकरीता शेवटची तारीख 30 सप्टेंबर 2022
सूचनेच्या विस्तृत माहिती करीता वेबसाईट वर लॉग इन करा
https//:mrvc.indianrailway.gov.in

मिनोशा इंडिया लिमिटेड
नोंदणी कार्यालय : युनिट नं. २०४, दुसरा मजला, टाऊन सेंटर I, मित्तल इंडस्ट्रिअल इस्टेट जवळ, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०५९
सीआयएन : यू७४९४०एमएच१९९३पीएलसी०७४६९४
टेलि.: +९१ २२ ६६८३ ३००० ईमेल : mil.secretarial@minosha.in संकेतस्थळ : htpps://www.minosha.in
२९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदी व त्याखाली तयार केलेले नियमांनुसार, सहवाच्यता कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने प्रसिद्ध केलेली परिपत्रके दिनांकित ०८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल, २०२०, ५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१ आणि ५ मे, २०२२ (एकत्रितरित्या एमसीए परिपत्रके संदर्भित) याअन्वये, कंपनीच्या सदस्यांची **२९वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (व्हीसी)/ अन्य ऑडिओ व्हिज्युअल साधने (ओएव्हीएम) द्वारे** सदस्यांच्या सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय **गुरूवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी सकाळी १०.३० (भाप्रवे)** आयोजित करण्यात आली आहे.
वर उद्धृत केलेल्या लागू तरतुदी आणि परिपत्रकांचे पालन करून, कंपनीच्या २०२१-२२ च्या वार्षिक अहवालासह २९ व्या एजीएमची सूचना केवळ ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीज आणि रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटकडे नोंदणीकृत आहेत अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवली जात आहे. कंपनीच्या २०२१-२२ च्या वार्षिक अहवालासह २९वी एजीएम बोलावणारी सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.minosha.in वर अपलोड करण्यात आली आहे. एजीएमची सूचना एजीएम दरम्यान व्हीसी/ओएव्हिएम सुविधा, रिमोट ई व्होटिंग सुविधा आणि ई-व्होटिंग सुविधा/सिस्टम प्रदान करणारी एजन्सी अर्थात सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या संकेतस्थळ www.evotingindia.com वर प्रसारित केली आहे.
सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हिएम सुविधेद्वारे एजीएममध्ये सामील होऊ शकतात आणि सहभागी होऊ शकतात. एजीएममध्ये सामील होण्याच्या सूचना आणि एजीएम दरम्यान रिमोट इलेक्ट्रॉनिक व्होटिंग किंवा ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे मत टाकण्याची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केली आहे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरम मोजण्याच्या उद्देशाने केली जाईल.
कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदींचे पालन करून, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० मध्ये वाचलेल्या, कंपनीला तिच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाचा हक्क बजावण्याची सुविधा प्रदान करण्यात आनंद होत आहे. सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त (रिमोट ई-व्होटिंग) इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टीम वापरून सभासदांनी मतदान करण्याची सुविधा सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) द्वारे प्रदान केली जाईल.
रिमोट ई-मतदान सुविधा **सोमवार, २६ सप्टेंबर, २०२२ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवे) वाजता सुरू होईल आणि बुधवार, २८ सप्टेंबर, २०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) समाप्त होईल.** या कालावधीत, **गुरूवार, २२ सप्टेंबर, २०२२** च्या कट-ऑफ तारखेनुसार, प्रत्यक्ष स्वरूपात किंवा अभौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणारे कंपनीचे भागधारक, त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देऊ शकतात. त्यानंतर सीडीएसएल द्वारे ई-व्होटिंग मॉड्यूल अक्षम केले जाईल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानास या तारखेच्या पुढे परवानगी दिली जाणार नाही. समभागधारकाने ठरावावर एकदा मत दिल्यानंतर ते त्यांना बदलता येणार नाही.
सभासदांचा ई-व्होटिंग आणि मतदानासाठी मतदानाचा हक्क हा त्या कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या पेड अप इक्विटी शेअर कॅपिटलमधील त्यांच्या शेअरहोल्डींगच्या प्रमाणात असेल.
कोणतीही व्यक्ती जी एजीएमची सूचना पाठवल्यानंतर कंपनीची सदस्य बनते आणि ज्यांची नावे सदस्यांच्या नोंदणीमध्ये किंवा लाभधारकांच्या नोंदणीमध्ये **गुरूवार, २२ सप्टेंबर २०२२** रोजी आढळतात, ती २९व्या एजीएमची सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.minosha.in किंवा सीडीएसएल च्या संकेतस्थळावर म्हणजेच www.cdslindia.com वरही पाहू शकतात. अशी व्यक्ती evoting@cdslindia.com वर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर व्यक्ती आधीच सीडीएसएल वर रिमोट ई-मतदानासाठी नोंदणीकृत असेल, तर ती/ते विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड वापरून मतदान करू शकतात.
व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित असलेले सदस्य, तसेच ज्यांनी रिमोट-ई-व्होटिंगद्वारे ठरावांवर आपले मत दिले नाही आणि ज्यांना तसे करण्यास प्रतिबंधित केलेले नाही अशा सभासदांकरिता एजीएम दरम्यान मतदानाची सुविधा देखिल उपलब्ध करून दिली जाईल आणि असे सभासद एजीएममध्ये ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
ज्या व्यक्तींची नावे सभासदांच्या नोंदवहीत किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये कट-ऑफ तारखेनुसार नोंदवली गेली आहेत, त्यांनाच एजीएममध्ये रिमोट-ई-व्होटिंग किंवा ई-मतदानाची सुविधा मिळण्याचा हक्क असेल.
डीमटेरियल फार्ममध्ये शेअर्स धारण केलेल्या आणि ज्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केले नाहीत त्यांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे आणि फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट मे. एमसीएस शेअर ट्रान्सफर एजंट लिमिटेड, एफ-६५, पहिला मजला, ओखला इंडस्ट्रियल एरिया, फेज १, नवी दिल्ली - ११००२०, ईमेल admin@mcsregistrars.com किंवा कंपनीसोबत mil.secretarial@minosha.in वर विनंती पाठवावी. २९ व्या एजीएमच्या सूचनेसह वार्षिक अहवाल २०२१-२२ ची सॉफ्ट कॉपी प्राप्त करण्यासाठी भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी नाव, फोलिओ क्रमांक, पत्ता, नोंदणीकृत ईमेल पत्ता नमूद केलेल्या स्वाक्षरी केलेल्या विनंती पत्रासह, पॅन कार्डच्या स्कॅन केलेल्या स्वयं-प्रमाणित प्रतीसह आणि कोणत्याही दस्तऐवजासह (जसे की ड्रायव्हिंग लायसन्स, आधार, पासपोर्ट आणि बँक स्टेटमेंट) सबमीट करून प्राप्त करू शकतात.
एजीएम मध्ये व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सामील होण्यासाठी आणि एजीएम मध्ये रिमोट ई-व्होटिंग/ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याच्या सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये दिल्या आहेत. सभासदांना विनंती आहे की एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व नोंदी आणि एजीएम दरम्यान व्हीसी/ओएव्हीएम, रिमोट-ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंगद्वारे एजीएममध्ये उपस्थित असलेल्या भागधारकांसाठीच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
अशी सूचना देखील देण्यात येत आहे की, कंपनीच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने **शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२ ते गुरूवार, २९ सप्टेंबर, २०२२ (दोन्ही दिवसांसह)** या कालावधीत कंपनीचे सदस्य नोंदवही आणि शेअर ट्रान्सफर बुक्स बंद राहतील.
तुम्हाला व्हीसी/ओएव्हीएम आणि ई-व्होटिंग सिस्टीममधून ई-व्होटिंगद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहण्याबाबत काही शंका किंवा समस्या असल्यास, तुम्ही www.evotingindia.com वर उपलब्ध मदत विभागांतर्गत वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि ई-व्होटिंग मॅन्युअल पाहू शकतात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल लिहा किंवा श्री राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांच्याशी संपर्क साधा किंवा सीडीएसएलच्या टोल फ्री क्रमांक १८०० २२ ५५ ३३ वर संपर्क साधावा. ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही समस्यांसाठी सदस्य mil.secretarial@minosha.in वर ईमेल लिहून वैकल्पिकरित्या कंपनीच्या कंपनी सचिव सुश्री ममता सुरकली यांच्याशी संपर्क साधू शकतात.
इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी/व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहून श्री राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्यूचरेक्स, मफतलाल मिल कंपाउंड्स, एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व) मुंबई - ४०० ०१३ यावर किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ई-मेल पाठवून किंवा सीडीएसएलच्या टोल फ्री क्रमांकावर १८०० २२ ५५ ३३ वर संपर्क साधावा.
मंडळाच्या आदेशाद्वारे
मिनोशा इंडिया लिमिटेडकरिता
सही/-
ममता सुरकली
कंपनी सचिव
ठिकाण : नवी दिल्ली
दिनांक : ६ सप्टेंबर, २०२२

खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
C. B. Kora Institute of Village Industry
शिपोली गाव, गव्हर्मेंट मेटाना जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई-९२.
गव्हर्नमेंट सर्टिफिकेट कोर्स
फोर व्हिलर (पेट्रोल) कार मेन्टेनन्स
नेगुलर बॅच गुरुवार दिनांक १५ सप्टेंबर २०२२ पासून १४ ऑक्टोबर २०२२ पर्यंत
माहिती व प्रशिक्षण वर्ग
मोबाइल : १२ सप्टेंबर २०२२ सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत
वैशिष्ट्ये:
✓एकूण जागा ३० पर्यंत मर्यादित
✓आधुनिक गाड्यावर प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण
✓अनुभवी व प्रशिक्षित प्रशिक्षकाद्वारे मार्गदर्शन
✓ऑडिओ विज्युअल साधनांचा वापर
✓स्टार्टअपसाठी मार्गदर्शन
पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत रु. ५० लाखापर्यंत कर्ज योजने ची माहिती व मार्गदर्शन
प्रवेशासाठी आवश्यक
वयोमर्यादा- किमान १६ वर्ष पूर्ण
दोन फोटोग्राफर्स व आधार कार्ड
पत्ता: डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स
टिळक रोड एक्सटेंशन, वडाळा, मुंबई ३१
संपर्क : 7972782723/ 9321577512 8108281576/ 9819212577

दक्षिण मध्य रेल्वे
आम्हाला फॉलो करा: @SCRailwayindia
एस.सी. रेल्वेच्या निविदा सूचनांचा तपशील संकेतस्थळावर पाहता येईल : www.scr.indianrailways.gov.in
ई-प्रापण निविदा सूचना क्र. २०२ दि. ०२.०९.२०२२
खालील निविदा ई-प्रापणद्वारे प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. निविदाकारांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी www.ireps.gov.in ला भेट द्यावी आणि त्यांचे प्रस्ताव सादर करावेत. **कृपया नोंद घेण्यात यावी की, प्रत्यक्ष सादर करण्यात आलेले किंवा पेपरवरील प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. टपालाद्वारे पाठविण्यात आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.**
अनुक्र. १. निविदा क्र.: टीएम२२७३६६ **वर्णन :** ट्रॅक मशिनसच्या वापरासाठी कन्झ्युमेबल्स म्हणजेच ग्रीस इत्यादीची खरेदी. **देय दिनांक :** २२.०९.२०२२.
अनुक्र. २. निविदा क्र.: टीएम२२७२४० **वर्णन :** ट्रॅक मशिनसच्या वापरासाठी यूटीव्ही मशिनच्या भागांची जसे की सील कीट, फिल्टर एलिमेंट, गाइड रिंग, स्लीव इत्यादीची खरेदी. **देय दिनांक :** २९.०९.२०२२
अधिक माहितीसाठी www.ireps.gov.in चा संदर्भ घ्या.
उपमुख्य अभियंता/टीएम/एचक्यू सिकंदराबाद
ए १०५१
त्याशिवाय निविदा अटी/ तपशिलासाठी आणि निविदा कागदपत्रे डाऊनलोडिंगसाठी https://www.ireps.gov.in किंवा www.scr.indianrailways.gov.in ला कृपया भेट द्या.

थॉमस कूक (इंडिया) लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : थॉमस कूक बिल्डिंग, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
टेलि क्र.: +९१-२२-४२४२ ७००० फॅक्स क्र..: +९१-२२-२३०२ २८६४ वेबसाइट : www.thomascook.in
टोल-फ्री नं. : १८००-२०९९-१०० ईमेल : sharedept@thomascook.in
सीआयएन : एल६३०४०एमएच१९७८पीएलसी०२०७१७
४५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-वोटिंग माहिती
याद्वारा सूचना देण्यात येते की "थॉमस कूक लिमिटेड"ची ("कंपनी") ४५वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") कंपन्या अधिनियम, २०१३ ("कायदा")च्या लागू तरतुदी व त्याखालील तयार केलेले नियम आणि जनरल सर्क्युलर नं. १४/२०२० दिनांकित ०८ एप्रिल, २०२०, जनरल सर्क्युलर नं. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२०, जनरल सर्क्युलर नं. २०/२०२० दिनांकित ०५ मे, २०२०, जनरल सर्क्युलर नं. ०२/२०२१ दिनांकित १३ जानेवारी, २०२१, जनरल सर्क्युलर नं. २१/२०२१ दिनांकित १४ डिसेंबर, २०२१ व जनरल सर्क्युलर नं. ०२/२०२२ दिनांकित ०५ मे, २०२२ (एकत्रितरीत्या "**एमसीए सक्युलर्स**" म्हणून संदर्भित) आणि सिक्युरिटिज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") सर्क्युलर नं. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित १२ मे, २०२० व सर्क्युलर नं. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांकित १५ जानेवारी, २०२१ आणि सर्क्युलर नं. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२२/ ६२ दिनांकित १३ मे, २०२२ च्या अनुपालनार्थ (एकत्रितरीत्या "**सेबी सर्क्युलर्स**" म्हणून संदर्भित), ज्यामध्ये सामायिक स्थळी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय "व्हीसी"/ "ओएव्हीएम"द्वारा "एजीएम"च्या आयोजनास परवानगी देण्यात आली आहे, "एजीएम"च्या सूचनेमधील कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता बुधवार, २८ सप्टेंबर, २०२२ रोजी दु. ०३:३० वा. (भाप्रवे) व्हिडीओ-कॉन्फरन्सींग ("व्हीसी")/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") याद्वारा घेण्यात येणार आहे. "एजीएम" सूचना व वित्तीय वर्ष २०२१-२२ करिता, इतर गोष्टींसमवेत, वार्षिक अहवाल, मंडळाचा अहवाल, लेखापरिक्षकांचा अहवाल आणि समाविष्ट ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय विवरणे अशा सर्व सदस्यांना, ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्स्फर एजन्ट ("आरटीए")/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत केलेले आहेत, केवळ इलेक्ट्रॉनिक प्रमाणित मंगळवार, ०६ सप्टेंबर, २०२२ रोजी पाठविण्यात आली आहेत/ पाठविण्यात येत आहेत. सदस्यांनी नोंद घ्यावी की "एजीएम" सूचना व वार्षिक अहवाल **www.thomascook.in** या कंपनीच्या वेबसाइटवर, **www.evotingindia.com** या सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या ("सीडीएसएल") वेबसाइटवर, **www.bseindia.com** या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर आणि **www.nseindia.com** या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध असणार आहेत. वित्तीय वर्ष २०२१-२२ करिता एकात्मीकृत वार्षिक अहवालासमवेत सूचनेची प्रत्यक्ष प्रत अशा सदस्यांना पाठवण्यात येणार आहे, जे त्याकरिता त्यांची नावे, फोलिओ नंबर/ डीपी आयडी व क्लायन्ट आयडी नमूद करून **sharedept@thomascook.in** यावरून विनंती पाठवतील.
सदस्य केवळ "व्हीसी" / "ओएव्हीएम"द्वारा "एजीएम"मध्ये उपस्थित राहू शकतील व सहभागी होऊ शकतील. सदर सहभागी होण्यासंबंधित सविस्तर सूचनांची "एजीएम"मध्ये तरतूद करून देण्यात आली